7:05 0.00 KB/S 4G 39

ागृती
ूर्तींचे

पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या बूथ समितीचे अध्यक्ष विजय

आवश्यक आहे.पर्यावरणपूरक गणेशमूर्तींच्या वितरणाचा उपक्रम आदर्शवत आहे.



# सायबर गुन्हे रोखण्यासाठी सतर्क राहण्याची गरज - पो.नि.प्रतिक कोळी

## न्यू आर्टस् बीबीएसीए च्या विद्यार्थ्यांची 'सायबर सुरक्षा' उपक्रमासाठी निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहमदनगर**– अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या न्यू आर्टस् कॉलेजच्या बी.बी.ए.सी.ए तसेच क्विकहिल फौंडेशन, पुणे यांच्यात सामंजस्य कराराअंतर्गत बीबीएसीए विभागातील विद्यार्थ्यांची 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमासाठी निवड करण्यात आली. याप्रसंगी अहमदनगर पोलिस सायबर विभागाचे पो.नि.प्रतिक कोळी, सहकारी श्री.सांगळे, श्री.अरकर, निवड प्रक्रियेसाठी क्वीकहिल फौंडेशनच्या सीएसआर एक्झिकेटीव्ह सुगंधा दाणी, समन्वयक चैताली बहिरवाडे आदिं सह वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य डॉ.कमळकर उपस्थित होते.

याप्रसंगी पो.नि.प्रतिक कोळी म्हणाले, आज तंत्रज्ञान विकसित होत असतांना प्रत्येकाला वस्तू, व्यवहार हे घरबसल्या ऑनलाईन होत आहेत. ही एक दृष्टीने फायदेशीर असले तरी यातही गुन्हेगारांचा शिरकाव ही मोठ्या प्रमाणात होत आहे, ही चिंताजनक बाब आहे. आपली एखादी चूक ही आपले बँक बॅलन्स शुन्य करु शकतो. त्यासाठी नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज आहे. यासाठी पोलिस प्रशासनाच्यावतीने जागृत करण्यात येत असून, त्याचबरोबर असे गुन्हे करणार्यांवरही कारवाई करण्यात येत आहे. या सायबर क्षेत्रात विद्यार्थ्यांचाही सहभाग असावा, त्यांनाही माहिती व्हावी, त्याचबरोबर त्यांच्या बुद्धी कौशल्याचा उपयोग व्हावा यासाठी न्यू आर्टस् मधील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. भविष्यात या उपक्रमाची व्याप्ती आणखी वाढेल, असे सांगून सायबर गुन्ह्याची उदाहरणे, त्यांची कारणे व त्यावरील उपाय याची विद्यार्थ्यांना माहिती दिली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सुगंधा दाणी यांनी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाबद्दल मार्गदर्शन करतांना या क्षेत्रातही विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी असून, त्यासाठी क्विकहिल फौंडेशन पुढाकार घेत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. कळमकर म्हणाले, न्यू आर्टस् कॉलेजच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जात असतात. नवनवीन तंत्रज्ञान, अभ्यासक्रमाचा समावेश करुन परिपूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमासाठी आमच्या विद्यार्थ्यांची निवड होणे ही कॉलेजची उपलब्धी असल्याचे सांगितले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशन व पथनाट्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा.तळुले यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.बडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.सौ.सुरोशी, प्रा.साबळे यांनी परिश्रम घेतले. शेवटी प्रा.सुपेकर यांनी आभार मानले.

या उपक्रमाचे प्राचार्य डॉ.बी.एच.झावरे, विभागप्रमुख निंबाळकर यांनी कौतुक केले. संस्थेच्या पदाधिकार्यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

# ा' गोरगरीबांना वरदान; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



राहणीमान सुधारण्यासाठी खर्ची घातले. संजीवनी सहकारी साखर कारखान्यासह अनेक सहकारी संस्था स्थापन करून शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध केले. ते खऱ्या अर्थाने कोपरगाव तालुक्याचे भाग्यविधाते आहेत. संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी